# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 22/6/2015 (का.प.क्र.-02) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

सोमवार दिनांक 22 जून 2015 रोजी (का.प.क्र.02) मा.सभापती श्री.दिलीप थोरात यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
02. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
03. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
04. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
05. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
06. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
07. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
08. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
09. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
10. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
11. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
12. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
13. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
14. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
15. स.स.श्रीमती रेश्मा अशपाक कुरैशी

श्री.गजानन बारवाल : मागिल बैठकीचे किती इतिवृत्त कायम करण्यासाठी येणे बाकी आहे.

नगरसचिव :तत्कालीन मा.सभापती यांनी शेवटच्या सभेमध्ये सर्व इतिवृत्त कायम केलेले असल्याने इतिवृत्त दिले नाही.आजच्या सभेला दिनांक 10-6-2015 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त कायम करण्यासाठी ठेवललेे आहे. सभागृहाची मागणी असेल तर मागिल इतिवृत्तांत देणे बाबत कार्यवाही होईल.

**<u>विषय क्र. 02 :</u>**

दिनांक 10/06/2015 (का.प.क्र.01) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.गजानन बारवाल : दिनांक 10/06/2015 रोजीच्या सभेचे सभागृहासमोर आलेले इतिवृत्त मंजूर करावे.

मा.सभापती :मागिल इतिवृत्तांत तयार करून घ्यावे,दिनांक 10/06/2015 रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

दिनांक 10/06/2015 (का.प.क्र.01) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस मंजुरी देण्यांत आली.

नगरसचिव　　:महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड प्रकरण 2 सभा कामकाज नियमावलीचे नियम 3 (ब) प्रमाणे स्थायी समितीची पहिली सभा आयुक्त ठरविल त्यादिवशी त्यावेळी भरविण्यात आली पाहिजे. त्यानंतरची प्रत्येक सभा स्थायी समिती ठरविल त्या दिवशी व त्यावेळी घेता येईल अशी तरतूद आहे.त्यानुसार साप्ताहिक सभेचा दिवस निश्चित करून मिळावा तसेच साप्ताहिक सभा बोलावयाचे व सभेचा दिवस व वेळ ठरविण्याचे अधिकार मा.सभापती यांना स्थायी समिती प्रदान करू शकेल.

श्री.गजानन बारवाल　　:ठिक आहे यानंतरच्या स्थायी समितीच्या सभा मा.सभापती यांनी दिवस व वेळ ठरवून देण्यास त्यांना अधिकार प्रदान करण्यास हरकत नाही.

श्री.नितीन चित्ते　　:सुचना केल्या प्रमाणे मान्य करण्यात यावे.

मा.सभापती　　:प्रास्तावित केल्याप्रमाणे साप्ताहिक सभेचा दिवस व वेळ ठरविण्याचा अधिकार सभापती स्थायी समिती यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

श्री.गजानन बारवाल　　:शहरामध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या त्यावर चर्चा व्हावी.

श्री.नितीन चित्ते　　:मा.पोलीस आयुक्त यांनी शहरातील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केली. 1-2 महिन्यात चांगले काम करून दाखवले त्याचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करावे.

श्री.गजानन बारवाल　　:यास माझे अनुमोदन आहे.

श्री.मोहन मेघावाले　　:मा.पोलीस आयुक्त यांचे अभिनदंन करावे तसेच अतिक्रमण काढण्यासाठी महापालिका अधिकारी यांना सक्षम पणे काम करण्याच्या सुचना दयाव्यात.पोलीस सरंक्षण घेवून अतिक्रमणे काढली पाहिजे महापालिकेचा अतिक्रमण विभाग सक्षम करावा.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:जी सुचना मांडली बरोबर आहे मा.पोलीस आयुक्त यांनी चांगले काम केले.अभिनंदनीय आहे.दु:ख वाटते असे अधिकारी मनपात नाहीत का चांगले काम केले तर प्रशंसा होणार अभिनंदन करण्यात येते हे ऐतिहासीक शहर आहे अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

श्री.मोहन मेघावाले　　:ज्यांच्या हातगाडया, टप-या हटविल्या ते गरीब लोक आहे मोलमजुरी करणारे लोक आहेत जनतेला त्रास होऊ नये.

श्री.रावसाहेब आमले　　:मा.पोलीस आयुक्त यांचे चांगले काम आहे त्याच प्रमाणे महापालिकचे अधिकारी काम करू शकतात. वार्ड अधिकारी यांना साफसफाईचे एक काम ठरवून दयावे. त्यांचेकडे जन्म-मृत्यू प्रमाणपत्र देणेचे सूध्दा काम आहे त्यामूळे इतर कामावर दुर्लक्ष होते.कामाचा व्याप जास्त आहे तो कमी करावा.ठराविक काम द्यावे.

श्री.विकास एडके　　:मा.पोलीस आयुक्त यांनी अतिक्रमण काढण्याचे चांगले काम केले अभिनंदन करावे.महापालिकेच्या अधिका-यांनी यापुढे परत अतिक्रमण होणार नाही याकडे लक्ष द्यावे साफसफाईचे कामाची जबाबदारी आपली आहे.

श्री.गजानन मनगटे　　:मा.पोलीस आयुक्तांचे अभिनदन करावे, 25-28 वर्षापासून महापालिका रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यात निष्क्रीय राहिलेले आहे.पोलीस विभागाने 15 दिवसात रस्त्यावरील अतिक्रमण हटविली.मनपातील अधिकारी यांना सुचना देवून ते सक्षम असेल तर 15 दिवसात नाल्यावरील अतिक्रमण हटवावे.

श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी:अतिक्रमण काढतांना गरीब लोकांचा विचार करावा.पार्कींग झोन व्यवस्थीत करावे व शंहर स्वच्छ सुंदर ठेवायचे असेल तर सेंन्टल नाका, भाजीमंडई तसेच

रोषणगेट कापूस गिरणी अशा अनेक ठिकाणी पार्कींग झोन करावे मनपाच्या जागेवर भाजी मंडई वाहनतळ कसे करता येईल ते पहावे.हातगाडया टपरी धारक या गरीब लोकांना व्यवसायासाठी जागा देणे संबधी कसा न्याय देता येईल ते तपासावे.

मा.सभापती :मा.पोलीस आयुक्ताचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते.स.सदस्यांनी सुचना केल्या सर्व विभाग प्रमुख यांनी आपला विभाग कार्यक्षम करून नागरीकांच्या तक्रारी येणार नाही याची दखल घ्यावी.

श्री.नितीन चित्ते :मा.पोलीस आयुक्त यांनी पाणी प्रश्नावर बैठक धेतली मा.आमदार मा.उपमहापौर बैठकीला उपस्थित होते. पाण्या विषय पोलीस विभागाला बैठक घ्यावी लागत असेल महापालिकेची ही मानहाणी असल्याचे समजतो.

मा.सभापती :कार्य.अभियंता श्री. कोल्हे यांनी खुलासा करावा.

काय.अभियंता(पापू) :35 दिवसात 40 वेळा लाईट गेली त्यामुळे 4 दिवस साडेचार तास लाईन नव्हती त्यामूळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला त्यासाठी स.सदस्यांनी अंदोलन केले.स.सदस्य टाकीवर जाणे पाणी सोडण्याची मागणी करीत असत यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मा.पोलीस आयुक्त यांनी कंपनीचे, महापालिकेचे अधिकारी कर्मचारी व स.पदाधिकारी यांची एकत्रित बैठक बोलविली बैठकीत कशा पध्दतीने काम करावे पाणीप्रश्न सोडण्यास मदत करावी यावर चर्चा झाली तशा सुचना देण्यात आल्या.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:चार तास लाईट गेली हे कशावरून मान्य करायचे.

कार्य.अभियंता(पापू) :त्या बाबतीत रेकॉर्ड आहे तो सादर केलेला आहे.

श्री.नितीन चित्ते :मी स्वत: इंजिनिअर आहे काही भागात आजही दोन दिवसानंतर पाणी येते वार्ड ब व ई भागात 5 व्या दिवशी पाणी येते.जनतेला उत्तर दयावे लागते.पाणीपुरवठा मनपाकडे होता तेंव्हा पाण्याला प्रेशर होते आताच का कमी झाले.याकडे लक्ष दिले जात नाही.आम्हाला सारखे फोन येतात 7-8 महिण्यापासून समांतर काय काम करते.

कार्य.अभियंता(पापू) :वार्ड कार्यालया अंतर्गत उपअभियंता यांचेकडे काम दिले आहे.

श्री.नितीन चित्ते : सिडको हडको मध्ये निर्जळी, संमातरच्या कर्मचा-यांना मारहाण,नवीन सदस्यांचा उद्रेक, समांतरचा चुकीचा नंबर अशा बातम्या छापून येत आहे.असे असतांना महापालिका प्रशासन काहीच करीत नाही जनतेला आम्हाला तोंड दयावे लागते आमच्याकडे प्रश्न मांडतात आजपर्यत समांतरच्या विरोधात काय कार्यवाही केली.

कार्य.अभियंता(पापू) :पाण्या विषयी ज्या बातम्या येतात त्या समांतर एजन्सीला कळविल्या जातात.

श्री्.नितीन चित्ते :समांतर कोणाचे बोलणे ऐकतात.ज्या भागात पाणी येणार नाही अशा वेळी तेथे टँकरने पाणी पुरवठा करावा अशी करारनाम्यात तरतूद आहे असे असतांना 7 महिण्यापासून कंपनी पाणी देत नाही.पैसे वसुल करणार का ?टाकीवर गेले तर सदस्यांवर गुन्हे दाखल होते.

श्री अब्दुल रहिम नाईकवाडी:समांतरचे कर्मचारी कुणाचेही ऐकत नाही.केंव्हापासून समांतरकडे काम दिले.कोण कोणाच्या अधिपत्त्याखाली काम करतात.

श्री.खान इरशाद :रमजान पुर्वी बैठक घेतली होती.पवित्र रमजान महिण्यातही त्रास ,आपण समांतर म्हणतो व समांतर महापालिकेकडे आहे म्हणतात.

कार्य.अभियंता(पापू) : 1 सप्टेंबर 2014 पासून समांतर कडे पाणीपुरवठा हस्तातंर केलेला आहे.

श्री.नितीन चित्ते :मा.पालक मंत्री यांनी आदेशीत केले की संमातरकडून होत असलेली वसुली थांबवावी ती थांबवली नाही.मा.सभापती यांनी लेखा विभागाला समांतरचे 15 कोटी थांबविण्याचे पत्र दिले तरी रक्कम देऊन टाकली सुचनाचे पालन होत नसेल तर योग्य नाही.प्रशासन कुणाच्या दबावाखाली काम करीत आहे.

श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी : पाणी मिळत नाही म्हणून सदस्यांना टाकीवर जावे लागते त्यांचेवर गुन्हा दाखल होतो हे बरोबर नाही.

श्रीमती शेख समीना :सदस्यांवर गुन्हा दाखल केलेला परत घ्यावा.

श्री.मोहन मेघावाले :पाणी विषयी काही प्रमाणात समस्या आहे,येत राहतील.मोठी योजना या शहरासाठी मा.खासदार श्री.खैरे साहेबांनी आणली योजना आली नसती तर मोठया अडचणी आल्या असत्या.कंपनीचे लोक नवीन आहे अधिकारी यांनी त्यांना समजावून सांगून सोबत घेवून काम करून घ्यावे.मोठी योजना आली असतांना जनतेला चुकीचे मॅसेज जातात नगरसेवकांना चुकीची माहिती मिळते. सिडको हडको भागातील नागरीक रेग्युलर टॅक्स भरतात या भागात पाणीपुरवठा सुरळीत येत नाही तो सुरळीत करावा.

श्री.विकास एडके :लाईट गेली तर पाणी मिळत नाही दोन महिणे लाइट गेली तर पाणी मिळणार नाही का? स.सदस्यांवर पाणी प्रश्ना वरून पोलीस केस होते ते मागे घ्यावी.

श्री.नितीन चित्ते :महापालिकेक्डे असतांना एक दिवसात काम होत होते आता नाही. काम निघाल्यास ऑर्डर काढा, जॉब कार्ड काढावे लागते सर्व कंपनीकडे काम गेले. वेळेवर काम होत नाही.

श्री.मोहन मेघावाले : महापालिकचे अधिकारी यांनी कंपनीचे कर्मचा-या सोबत राहून काम करून घेतले तर अडचण येणार नाही.

श्री.नितीन चित्ते :माझ्या वार्डात किती दिवसापासून किती घरांना पाणी येत नाही या संदर्भात मी 15 मे,12-6-2015 ला अर्ज देवून घराची यादी दिली कार्यवाही केली नाही 2-3 दिवसात समस्या सुटली नाही तर मी आमरण उपोषणास बसणार आहे.

श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी : माझ्या वार्डात 6 महिण्यापासून ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाण्याच्या लाईनमध्ये मिसळते. फक्त 50 फुटाचा पाईप टाकणे आहे. तेथे सिमेंट रस्ता होणार पाईप टाकून घ्यावे निदर्शनास आणून दिले. तर रस्ता करून घ्यावा लाईन टाकते वेळेस तो तोडता येईल अशी उत्तरे कपंनीचे लोक देतात दुषित पाण्याची बॉटल समांतरकडे पाठविली त्यांनी काहीच कार्यवाही केली नाही. तेथील फोटो काढले संबधीत अधिकारी यांना दाखवले परंतु कोणतीही कार्यवाही होत नाही.आम्ही काही केले तर गुन्हा दाखल होतो.

श्री.नितीन चित्ते :मा.पोलीस आयुक्त यांनी समांतरला 20 जुन पर्यत जनरेटर बसवावे असे आदेशीत केले कार्यवाही केली का?

श्रीमती ज्योती पिंजरकर :शिवनेरी कॉलनी भागात 5-6 दिवसानंतर 15-20 मिनिटे पाणी असते.10 मिनिटे पाणी प्रेशरने येत नाही.या बाबतीत सुचना देण्यात याव्यात.

श्री.गजानन बारवाल :स.मोहन मेघावाले दोन्ही बाजूने बोलत होते.त्यांना दोन्हीकडून अडचणीचे होते त्याचा त्रास आम्ही समजू शकतो.आम्ही सर्वांच्या बाजूने आहे पाणीप्रश्न सुटावा ही आमची भुमिका पाणीप्रश्ना वरून स.सदस्यांवर गुन्हा दाखल होतो हे बरोबर नाही तो परत घ्यावा.ऐनवळचा विषय ठेवतो तो घ्यावा ही विनंती.

श्री.मकरंद कुलकर्णी :आमची काही अडचण नाही जनतेला वेठीस धरू नये पाणीप्रश्न सुटावा वेळेवर पाणी दयावे अशी आमची भावना आहे व मागणी आहे.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी:45 मिनिटे पाणी येते त्यात 15 मिनिटे ड्रेनेजचे घाण पाणी येते.या बाबत कार्यवाही होणार की नाही. समांतर एजन्सी बरोबर केलेला करारनाम्याची प्रत सर्वाना देण्यात यावी.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.स्पष्ट ऐकू येत नाही.

श्री.मकरंद कुलकर्णी :जी वस्तुस्थिती आहे त्यानुसार बोलावे.ही योजना मा.चंद्रकातजी खैरे साहेबानी शहराच्या हितासाठी आणली पाणीप्रश्न सुरळीत करण्यापेक्षा त्यात खोडा घालण्याचे काम होत असेल व ते जनतेपर्यत नेण्याचा हा योग्य नाही.

श्री. मोहन मेघावाले :एवढी मोठी योजना आणली मा.खासदारांचे कौतुक करायला पाहीजे.

श्री.नितीन चित्ते :शहराला पाणी मिळाले पाहिजे ही आमची भावना आहे.

श्री.मकरंद कुलकर्णी :आम्हाला कुणाचे दडपण नाही जनतेच्या भावना आम्ही बोलतो.आमची काही अडचण नाही. (यावेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.गजानन बारवाल :शासनानेही निधी दिला आहे आम्ही जनतेचे प्रश्न मांडतो.

श्री.मकरंद कुलकणी :या योजनेसाठी राज्य व केंद्र शासनाकडे मा.खासदार श्री.चंद्रकातजी खैरे साहेबांनी पाठपुरावा केला. पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी प्रशासनाला सुचना कराव्यात. या योजनेला खोडा घालू नये.

श्री.कमलाकर जगताप :आम्ही कुणाच्या दडपणाखाली नाही.सदस्य जे बोलले चुकीचेआहे.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:समांतर योजना आणण्याचा विचार कसा समोर आला ते सांगावे. जनतेला घाण पाणी प्यावे लागते. नियोजन असावे.

(यावेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्रीमती कमल नरोटे :सर्वांचा प्रश्न पाण्याच्या समस्या विषयीच आहे. योजना कुणी आणली हा भाग वेगळा, जनतेचे प्रश्न मांडावे.काही वेळा 4 थ्या तर काही वेळा 5 व्या दिवशी पाणी मिळते तेही वेळेवर नाही याकडे लक्ष देण्याची गरज आहे.जनतेचे प्रश्न आमच्याकडे येतात.जितके दिवस गॅप असतो तेवढेच दिवस तो असावा असे नियोजन ठेवून नियमीत पाणी दयावे.

मा.सभापती :1 महिण्यापासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला. स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता आठ दिवसात पाणीपुरवठा सुरळीत करावा.

श्री.गजानन बारवाल :यास अनुसरूनच ऐनवेळचा माझा विषय आहे तो आपण घ्यावा ही विनंती.

मा.सभापती :विषय काय आहे सुचवावा.

श्री.गजानन बारवाल :

मा.सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका औरंगाबाद

औरंगाबाद शहरासाठी आगामी 30 वर्षाची लोकसंख्या व शहराचा विस्तार लक्षात घेता महानगरपालिकेतर्फे शहरासाठी समांतर जलवाहिनी योजना आखली असुन सदरील योजना मंजुरीसाठी राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्याकडे सन 2005-2006 मध्ये पाठविण्यात आली होती. या योजनेला मंजुरी ही सन 2008-2009 मध्ये मिळाली. त्यानंतर सन 2010 मध्ये निविदा प्रसिध्द होऊन सन 2011

ला अंतिमतः प्रक्रीया पूर्ण होऊन करार करण्यात आला. या दरम्यान सन 2005-2015 पर्यंत शहराच्या विकासात व सर्व बाबींमध्ये बराच फरक पडला आहे. परंतु पाणी पुरवठ्याची अवस्था जी 2005 ला होती तीच आज 2015 ला शहराच्या लोकसंख्या वाढीमुळे व इतर बाबीमुळे अतिशय बीकट झालेली आहे. आता या योजनेसाठी कॉम्बीनेशन ऑफ डीआय पाईप व एचडीपीई पाईप वापरण्याकरीता राज्य शासनाची व केंद्र शासनाची परत परवानगी घेणार असल्याचे समजते.

आपणांस विनंती करण्यात येते की, आधीच या योजनेला बराच वर्ष विलंब झालेला असून हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. बऱ्याच ठिकाणी पाण्यावरून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे औरंगाबादच्या मा.पोलीस आयुक्तांनी काही दिवसांपूर्वी मनपा प्रशासन व सदरील ठेकेदाराच्या कंपनीच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन पाण्याच्या नियोजनावर तीव्र नाराजी व्यक्त केली व तात्काळ पाणी पुरवठ्याचे नियोजन करून शहराची कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही, याकरीता तात्काळ उपाययोजना करण्यास सांगितले आहे. शराच्या इतिहासात पहिल्यांदाच शहराच्या मा.पोलीस आयुक्तांना महानगरपालिकेच्या कारभारात लक्ष घालावे लागले. राज्य व केंद्र शासनाच्या मंजूरीसाठी विलंब झाल्यास सदरील योजना वेळेत पूर्ण होणे अतिशय अवघड आहे. आमची आपणांस विनंती आहे की, या सर्व बाबी पाहता आणि योजनेला झालेला विलंब लक्षात घेता तात्काळ या योजनेचा डीटेल प्रोजेक्ट रिपोर्ट (डीपीआर) मध्ये नमूद केल्याप्रमाणे डीआय पाईप वापरून ही योजना तात्काळ पूर्ण करण्यास आदेशित करावे, जेणेकरून समांतर जलवाहिनीच्या योजनेच्या माध्यमातून शहराच्या नागरीकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल व ही योजना ठरलेल्या कालावधीत पूर्ण होईल.

हा विषय जनतेसाठी आहे. आम्ही कुणाच्या बाजूने काम करीत नाही तर जनतेच्या दबावाखाली काम करतो.

श्री.गजानन मनगटे : महानगरपालिका शहर अभियंता यांनी खुलासा केला आहे.

मा.सभापती :पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठीच आपण हा विषय मांडावा.

श्री.गजानन बारवाल :20 तारखेच्या सर्वसाधारण सभेत ऐनवेळचा इतिवृत्तातील विषय घाईघाईत मंजूर केला. आता डीआय ऐवजी एचडीपीई पाईप बसविणार असेल त्यासाठी राज्य व केंद्र शासनाची मंजूरीस वेळ लागेल. अगोदरच 15 वर्षापासूनचे पाईप आहे. शासनाची मंजूरीस वेळ लागेल व लाईन टाकण्याचे काम सुध्दा उशीरा होईल. मुळ डीपीआर मध्ये काय तरतूद होती.एचडीपीई पाईप बसविण्याकरीता शासनाची मंजूरी घेण्यास किती कालावधी लागणार आहे ?

श्री.इरशाद खान :केद्र शासनाकडे प्रस्ताव दिला त्यास 2008-09 मध्ये मंजूरी दिली.डीआय पाईप बसविण्यास पैसे ही मिळाले आता एचडीपीई पाईप बसविण्यासाठी केंद्र शासनाची मंजूरी येण्यास उशीर लागेल त्यानंतर पाणीपुरवठयाची विकास कामे होण्यास सुध्दा उशीर होइल.योग्य ती कार्यवाही तातडीने व्हावी.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:30-35 वर्षापुर्वीच्या पाईप लाईन टाकलेल्या आहेत. डीआय ऐवजी एचडीपीई कमी दरात पडणार 153 कोटीचा फायदा होणार त्यास शासनाची मंजूरी लागणार आहे ही प्रोसेस किती दिवस चालणार आहे. यात वेळ जाईल विकास कामे होणार नाही डीआय पाईप बसवावे.या दोन्ही पाईपची आयुष्य किती आहे.शासनाची पॉलीसी काय आहे,माहिती दयावी.

श्री.नितीन चित्ते : एचडीपीई पाईप बसविल्यास 153 कोटीचा फायदा होणार असे म्हटले कंपनीने खरेदी करण्या ऐवजी महापालिकेने ते पाईप खरेदी करावे.एचडीपीई पाईप बसवले तर अगामी बजेट मध्ये 153 कोटी वजा होणार आहे का ?

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी :पाईप बदलून 153 कोटीचा महापालिकेला फायदा-तोटा बाबत धोरण ठरल्यानंतर मा.आयुक्ताच्या निणर्यानंतर अकांउटमध्ये कंसीडर होईल.

श्री.गजानन बारवाल :डीपीआर मध्ये काय ठरले, मा.आयुक्त,यांनी प्रीबीड बैठक घेतली.सुकाणू समितीची बैठक झाली एचडीपीई पाईप बसविण्याचा विषय चर्चेला आलेला नाही सर्वसाधारण सभेत विषय मंजूर केला त्या सभेच्या कॅसेट मध्ये रेकॉर्ड झालेले नाही असे असतांना हा बदल करता येतो का ?

श्रीमती शेख समीना :एचडीपीई पाईप स्वस्त आहे म्हणून घेतो परंतु त्या पाईपचे आयुष्य किती, कॉलीटी कशी आहे.

कार्य.अभियंता (पापू) :केंद्र शासनाच्या UIDSSMT अंतर्गत हा प्रस्ताव मंजूर झाला त्यास दि. 23.06.2006 ला मान्यता प्राप्त झाली. केंद्र शासनाने ही योजना 30.06.2009 ला मंजूर झाली तीन वर्षाचा कालावधी गेला. या योजनेचे अंदाजपत्रक सन 2005-06 च्या नुसार 359 कोटीचे तयार केले डीआय पाईपचा समावेश करून ही योजना करणार होतो. सन 2008-09 मध्ये या योजनेची किमंत 511 कोटीने वाढली यात काही पाईप व मीटरींगची समावेश केला. 792 कोटीची योजनेचा प्रोजेक्ट तयार करून तो पीपीपी तत्वावर राबविण्याचे ठरले. मान्यता झाल्यानंतर निविदा मागविण्यात आल्या या दरम्यान एक प्रीबीड बैठक झाली त्यात निविदा धारकांना डीआय +एचडीपीई वापरण्याची परवानगी दयावी अशी मागणी केली.त्या मागणीच्या अनुसरून कन्सेशनर यांना केंद्र व राज्य शासनाकडून आवश्यक ती मान्यता प्राप्त करणे, अशा बदलामुळे महानगरपालिकेस कोणताही आर्थीक भार सोसावा न लागणे, विकासकाने द्यावयाच्या सेवा सुविधांचा स्तर हा Service Level Requirment नुसार असणे आणि शासनाने असा बदलास मान्यता न दिल्यास वितरण व्यवस्थेत फक्त DI पाईप वापरणे अशा अटीवर प्रीबीड बैठकीमध्ये मान्यता दिली त्यानुसार निविदा स्थायी समिती सभा दिनाक 22-3-2011 ठराव क्रमांक 213 नुसार मान्यता झालेली आहे.

श्री.नितीन चित्ते :केंद्र शासनास प्रस्ताव केंव्हा पाठविला ,मंजूर केंव्हा झाला टेंडर केंव्हा झाले व आता पाईप बदलणार आहे यास किती कालावधी लागणार आहे.

कार्य.अभियंता(पापू) :जो पर्यत शासनाची मान्यता मिळणार नाही तोपर्यतडीआय पाईप वापरण्यास कंपनीने मान्य केले आहे.

श्री.गजानन बारवाल :डीपीआर मध्ये काय होते.

कार्य.अभियंता (पापू) :मुळ डीपीआर हा 359.67 कोटीचा आहे.

श्री.गजानन बारवाल :359 कोटीवरून ही योजना 792 कोटीवर गेली. एचडीपीइ पाईप टाकण्यास वेळ लागणार आहे एकीकडे बचत करण्याचा प्रयत्न करतो तर दुसरीकडे या योजनेची किमंत वाढत जाते यामूळे जनतेला पाणी मिळणार नाही.2005 पासून योजना सुरू केली 10 वर्ष झाले आता पुन्हा मागे जायचे का ? जे करतो आहे त्यामूळे अडचणीचे होणार आहे जर प्रीबीड बैठकीत ठेकेदारा बरोबर सर्व काही ठरले कसे काम करावे काय काम करावे, फायदा व नुकसान किती होणार हे सर्व त्यांना माहित

आहे 153 कोटीच्या तुलनेत जे शेअर्स महापालिकेचे आहे त्यानुसार किती फायदा होणार आहे.

कार्य.अभियंता(पापू) : कॉम्बीनेशन ऑफ डीआय +एचडीपीई यास शासनाची मान्यता झाल्यास Annual Operation Support Grant म्हणून जी 63 कोटी देतो त्यात त्या प्रमाणात कपात होईल.

श्री.गजानन बारवाल :किती टक्के कपात होईल.डीपीआर मध्ये टक्केवारी दिली मनपाचा शेअर्स किती ते सांगावे.

कार्य.अभियंता(पापू) :मान्यता मिळतांना जो सहभाग असेल त्या टक्केवारीनुसार कपात होईल महापालिकेचा 10 टक्के सहभाग आहे.

श्री.गजानन बारवाल :जर एचडीपीई पाईप वापरण्याची मंजूरी येण्यास वेळ लागला तर योजनेची किंमत किती वाढणार याचा अंदाज प्रशासनाकडे आहे का ?

कार्य.अभियंता-(पापू) :एचडीपीई+डीआय पाईप कॉम्बीनेशन दिले तर Annual Operation Support Grant मध्ये जी प्रतिवर्षी दयावयाची रक्कम त्या प्रमाणात कमी होणार तसेच सी.ए. चा जो कलम कन्सेसन ॲग्रीमेन्टचा 20.5 प्रमाणे जे 399 कोटीचे अनुदानामध्ये सुध्दा त्या प्रमाणात कपात होणार आहे.त्याची टक्केवारी राज्य शासन मान्यता देतांना ठरवून देईल शेअर्स 10 टक्के आहे मुळ जे अंदाजपत्रकात जो काही फरक पडणार आहे त्या फरकावरील 10 टक्के होणार आहे किती कमी व जास्त होईल आताच सांगता येत नाही.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी :15 वर्ष मागे जात आहोत. एचडीपीई पाईपचा प्रस्ताव मंजूर होतो तर आणखी 10 वर्ष मागे चाललो आहोत. 1200 ची योजना 2400 कोटीवर जाईल.वर्षानुवर्ष असेच चालू राहिल्यास संमांतर लाईनचे काम पुर्ण होणार नाही शासनाची मान्यता येईपर्यत काम चालू राहणार असे म्हटले तर कंपनीकडे पाईप नाही ठेकदार नाही अंदापत्रक तयार नाही कसे काम करणार आहे. 11 महिण्यात कंपनीने मुस्लीम भागातील वार्डात 1 ही पाईप लाईन टाकली नाही.

श्री.गजानन बारवाल :स्थायी समिती ही महापालिकेची आर्थीक बाजू व फायदा होतो की नुकसान हे स्थायी समिती बघते. स्थायी समितीचे लक्ष महानगरपालिकेच्या कारभारावर असते. विनंती की सर्वसाधारण सभा जरी निर्णय घेत असेल तर त्याची दखल घेणेची गरज आहे. 15 वर्ष मागे जात आहोत. या योजनेचा बोजा महापालिकेवर वाढत आहे. 359 ची योजना 792 कोटीवर गेली. कंपनीला 5.25 कोटी दरमहा भरतो एकाही वार्डात काम केले नाही 50 फुटाचा पाईप कंपनीकडे नाही मी दिलेला प्रस्ताव मंजूर करावा व डीआय पाईपच वापरावे व तसे शासनास कळवावे.

श्री.मोहन मेघावाले : बजेट ठेवतांना सर्व वार्डात तरतूद केली जाते. त्या वार्डातील सदस्यांनी पाठपुरावा करून कामे करून घ्यायची असतात.आपण जनतेचा विचार करू.आताच म्हटले 15 वर्ष झाले 792 कोटीवर योजना गेली.15 वर्ष राज्यात व केंद्रात कॉग्रेस सरकार होते.आज ही राज्यात भाजपाची सत्ता आहे. या प्रस्तावास मंजूरी घेण्यास वेळ लागणार नाही आपण सर्वांनी तसे प्रयत्न करावे.

श्री.नितीन चित्ते :केंद्र व राज्य शासनाचा निधी या योजनेसाठी अगोदरच आलेला आहे. माझ्या वार्डात अनेक दिवसापासून काम थांबले होत नाही.

श्री.मोहन मेघावाले :माझा वार्डात मुस्लीम संख्या जास्त आहे मुस्लीम भागातून ड्रेनेजचे लाईनचे पहिले काम सुरू झाले. भुमीगत गटार योजना मा.खासदार साहेब यांनी आणली अभिनंदन करायला पाहिजे.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्रीमती ज्योती पिंजरकर :जाती धर्मावर न बोलता विषयावर बोलावे.

श्रीमती रेश्मा कुरैशी :कोणत्या कामाचे अंदाजपत्रक मंजूर केले कोठे काम केले माहिती दयावी.

मा.सभापती :जो प्रस्ताव दिला त्यानुसार शहरातील पाणीपुरवठयाचे नियोजन करणे गरजेचे आहे.समांतर जलवाहिनी योजना विविध कारणामूळे उशीरा कार्यान्वित होत आहे.पाण्यासाठी जनतेला त्रास सहन करावा लागत असल्याने शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची परीस्थिती निर्माण होत आहे.ही योजना ठरलेल्या कालावधीत पुर्ण करावी डीपीआर मध्ये नमुद असल्यानुसार ही योजना पुर्ण करावी.

शहराचे पाण्याचे नियोजन पूर्णत: बिघडले असून तात्काळ उपाययोजना करणे गरजेचे आहे व समांतर जलवाहीनी सारखी योजना जी विविध कारणांमुळे बऱ्याच वर्षापासून रखडल्यामुळे शहरातील नागरीकांना पाण्यासाठी खुप त्रास सोसावा लागत आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था देखील बिघडण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. करीता ही योजना ठरवलेल्या कालावधीत पूर्ण होणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रशासनाने आणखी वेळ न घालविता डीटेल प्रोजेक्ट रिपोर्ट (डिपीआर) मध्ये नमुद केल्याप्रमाणे डीआय पाईप वापरून ही योजना तात्काळ पूर्ण करावी. आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

श्री.विकास एडके :पाणीपुरवठा सुरळीत होत नाही तोपर्यत कंपनी करीत असलेली वसुली थांबवावी.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:हर्सुल तलावातील गाळ काढणे चालू आहे त्यांची निविदा काढली होती का ?.

श्रीमती समीना शेख :स्थायी समितीने यास मान्यता दिली का ?

कार्य.अभियंता(अ/ड) :निवीदा झाली आहे. स्थायी समितीची मान्यतेसाठी पुढील सभेत प्रस्ताव ठेवला जाईल.

श्री.नितीन चित्ते :समांतर एजन्सीला दरमहा पैसे देतो तशी सेवा कंपनी देत नाही तत्कालीन सभापती यांनी समांतर एजन्सीली 15 कोटी देण्याचे थांबवावे पत्र दिले अमलबजावणी का केली नाही.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:हर्सुल तलावातील गाळ काढला असता तर पाण्याची काही प्रमाणात टंचाई दुर झाली असती.

कार्य.अभियंता-(पापू) :शेतकरी व नागरीक गाळ घेवून जात आहे बराचसा गाळ काढलेला आहे.मा.आयुक्तांची मान्यता झाल्यानंतर तसा प्रस्ताव सभेपुढे येईल.

श्री.गजानन बारवाल :मनपाने गाळ का काढला नाही.15 कोटी संमातरला देऊ नये असे सभापती यांनी पत्र दिले होते ती रक्कम का देण्यात आली.

मुख्यलेखाािकारी :दरमहा एजन्सीला 5.25 कोटी याप्रमाणे तीन महिण्याचे 15.75 कोटी देतो मा.सभापती व उपमहापौर यांनी पत्र देऊन एजन्सीला रक्कम देऊ नये अये म्हटले संबधीत विभागाचा अभिप्राय घेवून, पैसे दिले नाही तर व्याजाची रक्कम दयावी लागेल असे म्हटले.मा.आयुक्ताची मान्यता घेवून रक्कम अदा केली आहे.

श्री.गजानन बारवाल :रक्कम देतांना मा.महापौर,उपमहापौर तसेच सभापती यांना विश्वासात का घेतले नाही?

श्री.नितीन चित्ते :ज्या दिवशी पाणी येणार नाही त्यावेळी कंपनी टॅकरने पाणी देणार असे अटीशर्तीनुसार आहे टॅंकर आले नाही तर ते कंपनीचे पैसे कपात करतो का ?

मुख्यलेखाधिकारी :तसा कोणताही प्रस्ताव माझ्याकडे नाही.

श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी :600 रू टॅंकरचे देतो नागरीक पैसे भरतात अनेक वेळा पाणी दिले जात नाही अशा वेळी त्या टॅंकरचे पैसे कपात करतो का? अटी शर्तीनुसार कंपनीवर कार्यवाही होते का? काम करण्याचे सांगितले तर पैसे नाही अशी कंपनीकडून उत्तरे मिळतात.

कार्य.अभियंता-पापू :निविदेमध्ये ज्या अटी शर्ती नुसार पहिल्या वर्षी AOSG ची रक्कम जी सेवास्तर नाही.गरजा म्हणून आहे दुस-या वर्षी 25 टक्के रक्कम निगडीत केली आहे 25 टक्के रक्कम एक वर्षाच्या नंतर कपात करू शकतो.

श्री.गजानन बारवाल : कंपनीच्या कामावर महापालिका समाधानी आहे का ?

श्री.नितीन चित्ते : कंपनीला रक्कम लगेच दिली जाते कंपनी काम करीत नाही तर 25 टक्के रक्कम कपात केली का ?25 टक्के रकमेत सर्विसेस नाही का?

श्री.गजानन मनगटे :5.25 कोटी दरमहा देतो.पाणीपुरवठा मनपाकडे होता तेंव्हा ही रक्कम खर्च होत नव्हती का?

श्री.रावसाहेब आमले :माझ्या वार्डात गुंठेवारीमध्ये हॉटेलचे काम केले.ते पुर्ण रस्त्यावर असून नाल्यावर अतिक्रमण केले या बाबत विचारणा केली असता सचिंका गहाळ झाली असे उत्तर मिळाले या हॉटेलच्या बांधकामामुळे बाजूच्या लोकांच्या घरात पावसाचे पाणी जात आहे.

श्रीमती कमल नरोटे :जानेवारी 2015 पासून गुंठेवारीतील किती घरे रेग्युलर केले प्रमाणपत्र कितींना दिले.

उपअभियंता(गुंठेवारी) :संचिका मंजूर झाल्यानंतर वार्ड अभियंता यांचेकडे जाते त्यांचा अभिप्राय घेतल्यानंतर गुंठेवारी विभागात संचिका येते त्यानंतर पुढील कार्यवाही होते.

मा.सभापती :स.सदस्यांनी जी तक्रार केली त्या संदर्भात कार्यवाही करावी पुढील सभेत माहिती दयावी.

श्री.मोहन मेघावाले :स्वामी विवेकांनद उद्यान च्या बाजूला रोज गार्डनचे काम चालू आहे तेथील मुरूम काढला जात असून तो महापालिकेच्या जागेवर पडतो का ,की खाजगी व्यक्तीला विकला जातो तसेच हर्सुल येथील गाळ काढण्याकरीता शासनाकडून 2 कोटी आलेले आहे तेथील गाळ काढण्याची कार्यवाही का केली नाही गाळ काढणार असेल तर उदयानमध्ये टाकण्यात यावा जेणे करून महापालिकेला विकत माती घेण्याची गरज पडणार नाही.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:हर्सुल येथील गाळ दुस-या नागरीकांना विकतो का ?

कार्य.अभियंता(अ ड) :हर्सुल तलावातील गाळ लोक घेवून जात आहे.या संदर्भात मालमत्ता अधिकारी यांना पत्र देऊन चौकशी करण्या बाबत कळविले त्यावर या विभागाकडून गाळ नेण्याचे थांबविले होते.गाळ काढण्याचे टेंडर काढले कार्यवाही होत आहे.स्थायी समिती फार्म झाली नव्हती ठराव थांबवले लगेच ठेवणार आहोत.

श्री.नितीन चित्ते :महानगरपालिकेची परवानगी लागते का ? 7-8 महिणे झाले सेवा दिली पाहिजे. मा.सभापतींनी लेखा विभागास पत्र दिले होते की 15 कोटी समांतरला देवू नये का दिले ?

कार्य.अभियंता(पापू) :शेतक-यांना सुविधा दिली होती बराच गाळ काढण्यात आला.

मा.सभापती :पुढील बैठकीत ठेवावे.

श्री.मोहन मेघावाले :दररोज किती मुरूम तेथून जातो कुठे टाकला जातो.

श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी:माझ्या वार्डात उद्यान आहे तेथे माती नाही हर्सुल येथील गाळ मोफत देतो व उदयानमध्ये माती टाकतांना विकत घेतो.100 जवळपास उदयान असेल तेथे माती कोठून आणावी किती टाकावी या बाबत नियोजन केले का ?

कार्य.अभियंता (पापू) :हर्सुल येथील गाळ मनपाच्या जागेवर ठेकेदार जमा करणार आहे.

श्री.मोहन मेघावाले :तेथील गाळाची मनपाच्या उद्यानसाठी गरज नाही का किती गाळ मोफत दिला.

उपअभियंता(श्री.निकम) :मागिल वर्षी हर्सुल तलाव पुर्ण कोरडा झाला होता. तेथील गाळ आजूबाजूच्या नागरीकांनी शेतीसाठी स्वखर्चाने नेला त्याच दरम्यान तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी तेथील तलावास भेट दिली. गाळ काढल्यामूळे साठवण क्षमता वाढली.व आणखी साठवण क्षमता वाढविण्यासाठी शासनाने महापालिकेला 2 कोटी रूपये प्रदान केले.आता सुध्दा काही शेतकरी गाळ काढून नेत आहे त्याच बरोबर काही लोक रेती नेत असल्याची तक्रार आली.आता पावसाळयाचे दिवस जवळ आल्याने गाळ व तेथील रेती नेन्याचे बंद केले.

श्रीमती समीना शेख :गाळ काढण्याचे टेंडर नागरीक व शेतक-यांना दिले आहे का?

श्री.मोहन मेघावाले :पुर्वी मोफत गाळ नेण्याचे ठरले होते शासनाकडून 2 कोटी आले आता तो गाळ मनपा ठेवून घेणार आहे का उदयान मध्ये टाकणार ?रोज गार्डनचे काम चालू आहे तेथे गाळ टाकावा लागणार आहे.

मा.सभापती :हर्सुल येथील निघालेला गाळ महापालिकेच्या उदयानमध्ये टाकण्याची कार्यवाही करावी.

श्रीमती समीना शेख :शहरात खड्डे बुजविण्याच्या नावाखाली पॅचवर्कचे काम होत आहे त्यात खडी, डस्ट,खत मिक्स करून टाकले जाते कोणती पकड राहत नाही एकाच पावसात वाहून जाते.यात महापालिकेचे नुकसान होते कोणकोणत्या एजन्सीना पॅचवर्कची किती कामे दिली आहे काम निष्कृष्ठ दर्जाचे होत असतांना ही कामे रद्य का करण्यात येत नाही.खुलासा घ्यावा.

वार्ड अभियंता (अ) :प्रभाग समिती अ अंतर्गत क्षेत्रात पॅचवर्कची कामे केली आहे.काही ठिकाणी कामे झालेली नाही.

श्रीमती शेख समीना :वार्ड क समिती अंतर्गत पॅचवर्क केल्याचा खुलासा करावा.

वार्ड अभियंता (क) :पावसामुळे मुरूम टाकलेला आहे. रेटलिस्ट च्या कामातील मटेरियल टाकले आहे.मस्कट कन्ट्रक्शन एजन्सी काम करते.

मा.सभापती :निष्कृठ दर्जाचे काम होते अशी स.सदस्यांची तक्रार आहे चाांगले काम करावे.

श्री.रावसाहेब आमले :वार्डातील लाईट बंद आहे विचारणा केली असता मुदत संपली अशी उत्तरे एजन्सीकडून मिळते. पुढील कामासाठी टेंडर काढावे नसता महापालिकने काम करावे.

श्रीमती रेशमा कुरैशी :माझ्या वार्डात रस्त्याचे 20 वर्षापासून काम होत नाही.ड्रेनेज लाईन फुटलेली आहे पावसाच्या पाण्यामूळे ते घाण पाणी लोकांच्या घरापर्यत जाते.याकडे लक्ष दिले जात नाही.

श्रीमती ज्योती पिंजरकर : माझ्या वार्डात 3 महिण्यापासून लाईट बंद आहे फोन केला तर उचलत नाही.

मा.सभापती :स.श्री.मोहन मेघावाले यांनी मुरूमच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला तीन अधिकारी डीपीडीसीच्या बैठकीला गेलेले आहे लेखी उत्तर अधिकारी यांनी स.सदस्य यांना दयावे.लाईट बाबत खुलासा करावा.

कार्य.अभियंता(विदयुत) :30 जून ला 12 एजन्सीचा ठेका संपत आहे.सर्वानी सहकार्य केले त्यानुसार काम चालू आहे मागिल जे जे अनुभव आले त्यानुसार आता नवीन निविदा तयार केली यापुढे तक्रार राहाणार नाही 10-12 वार्डासाठी एक कॉन्ट्रक्टर होते आता 6 वार्डसाठी एक अशा प्रकारे निविदा तयार केली.मागिल कॉन्ट्रॅक्टमध्ये फक्त फिटींग, रिपेरींगचे काम होते त्यात बॉक्स तुटला तर, तसेच केंबलचे काम इतर दुरूस्तीचे

कामे नव्हती.आता प्रत्येक वार्डसाठी एमएसईबी प्रमाणे टेम्पो व साहित्य राहिल ठेकेदाराने ती व्यवस्था करायची. 24 तासात ज्या ज्या तक्रारी येतील त्या नुसार रात्र-दिवसा असेल काम केले पाहिजे.

श्रीमती कमल नरोटे :30 जून रोजी कंपनीची मुदत संपणार तो पर्यत काम करावे.

श्रीमती शेख समीना :काम केले नाही तर दंडाची रक्कम आकारावी.

कार्य.अभियंता(विद्यु.) :ती सुध्दा कार्यवाही होईल.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी तक्रारीची दखल घेवून कार्यवाही करावी.

श्री.मोहन मेघावाले :पुढील सभेत सर्व अधिकारी उपस्थित असावे सुचना देण्यात याव्यात. माझ्या वार्डात डी मार्कचे काम चालू, त्यास बांधकाम परवानगी ,भोगवटा प्रमाणपत्र दिले का माहिती दयावी.

मा.सभापती :स.सदस्य यांना लेखी खुलासा देण्यात यावा.

श्री.मकरंद कुलकर्णी :वार्डात औषध फवारणी होत नाही एजन्सीस काम करीत नाही काळया यादीत टाकावे नव्याने टेंडर काढून एजन्सी नियुक्त करावे.

मा.सभापती :या बाबत प्रशासनाने दखल घेवून तातडीने कार्यवाही करावी.

श्रीमती रेश्मा कुरैशी :वार्ड 69 मध्ये ड्रेनेज लाईनचे काम होत नाही ते घाण पाणी पाऊस झाल्यानंतर लोकांच्या घरापर्यत जाते तसेच रस्त्यावर मोठे खड्डे पडले ते बुजवले जात नाही.

वार्ड अभियंता-ड :ड्रेनेज लाईनचे अंदाजपत्रक तयार केले मंजूरीसाठी पाठविले.

मा.सभापती :ड्रेनेजचे पाणी साचणार नाही यासाठी त्वरीत काम करण्याची कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी: माझ्या वार्डातील 25-30 वर्षापुर्वीची ड्रेनेज लाईन नेहमी चोकअप होते बदलण्याचे काम होत नाही तसेच गुंठेवारीत काम करता येत नाही असे सांगण्यात येते शासनाचा जीआर आहे तो वाचावा पुढील बैठकीपर्यत गुंठेवारी भागात कामे सुरू करण्याचे आदेशीत करावे.तसेच मनपामध्ये दैनिक वेतनावरील 200-300 कर्मचारी यांना मुदतवाढ दिली नाही 2 महिन्यापासून त्यांना पगार नाही याबाबत कार्यवाही व्हावी.

श्रीमती ज्योती मोरे :माझ्या वार्ड आदर्शकॉलनी भागात हौसींग सोसायटीमध्ये पावसाचे पाणी तुंबते भुमीगत गटार योजनेमध्ये काम करण्यात यावे.तसेच राजे चौक ते शिवनेरी कॉलनी पर्यतची ड्रेनेज लाईन चोकअप होते घाण पाणी वाहते.

आस्थापना अधिकारी-1 :दैनिक वेतन कर्मचा-यांना मुदतवाढ देणेसाठी विविध विभागाकडून प्रस्ताव मागीतले ते प्राप्त झाले आहे एक आठवडयात मुदतवाढ होईल.

श्री.नितीन चित्ते :20 जून 15 रोजी दिव्यमराठीला बातमी होती कि,मा.महापौर यांनी श्रीकृष्णनगर येथील नाल्याची पाहणी केली असता नाल्यावर स्लॅब टाकून एका बिल्डरने मोठे बांधकाम केले.भुमीगट गटार योजने अंतर्गत नाल्यातून पाईप टाकण्यास जागा ठेवली नाही.बाजूच्या खुल्या जागेतून पाईप लाईन टाकणे अवघड असून बिल्डरचे चक्क तारेचे कपाऊंड केले हा प्रकार गंभीर असल्याचे महापौरांनी कबूल केले मनपा लवकरच हे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करेल असे म्हटले त्यानुसार काय कार्यवाही केली.

मा.सभापती :मी सुध्दा पाहणी केली विषय गंभीर आहे.पावसाचे पाणी नाल्यातून जाणार नाही त्यामूळे पाणी बाजूच्या वसाहतीमध्ये शिरते. काय कार्यवाही करणार आहे.

प्रशासकीय अधिकारी :या बाबतची संचिका तयार केली. परवानगी दिलेली आहे असे बिल्डरचे म्हणणे आहे दिली नसेल तर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.नितीन चित्ते :विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे 11-1-1 अे नुसार नाल्यापासून 15 फुटाच्या अंतरापर्यत कुठलेही कन्ट्रक्शन करू नये असा नियम आहे.परंतु त्यांनी चक्क नाल्यावरच बांधकाम केले. विशेष बाबत म्हणून परवानगी दयायची असेल तर 500-1000 लोक त्याजागेतून विस्तापित होत असेल तर तेथे परवानगी दिली जाते.असे लोक तेथे होते का, की फक्त एक बिल्डर स्थायिक होते माहिती दयावी.

प्रशासकीय अधिकारी : संचिका तयार आहे नगररचना विभागाने परवानगी दिली नसेल तर कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती :खिवंसरा पार्क पासून पुढे नाला बंदीस्त करण्यात आला पुढे बांधकाम चालू आहे. भुमीगट गटारचे काम या नाल्यातून करू शकत नाही होत असलेले बांधकामास परवानगी दिली का?

सहा.संचालक(न र) :अशी परवानगी दिल्याचे आठवत नाही.आजच त्या ठिकाणी श्री.झनझन यांचेसह पाहणी करतो.

श्री.गजानन बारवाल :शहरात नाले सफाई व स्वच्छता होत नसल्याने समस्या निर्माण होत आहे क्रांतीनगर ते पदमपूरा पर्यंतच्या नाल्यामूळे अनेक लोकांच्या घरात पाणी जाते. अदालत रोड ते बाबा पेट्रोल पंपा जवळील, मनपा मुख्य इमारतीच्या बाजूचा नाला पुर्ण भरलेला आहे साफसफाई नाही.शहरातील गोमटेश मार्केट, जुना बाजार, काळा दरवाजा अशा सर्व नाल्याची पाहणी केली असता साफसफाई झालेली नाही काही ठिकाणी कर्मचारी कामाला लावले परंतु यंत्रणा कमी पडते.वार्डातील छोटया मोठया नाल्या आहेत त्यावरील ढापे काढून साफ करणे जरूरी आहे.वार्डात साफसफाई होत नाही.भौगोलिक परीस्थिती बघता कर्मचा-यांची आवश्यकता आहे.शहरात वेळेवर साफसफाई होत नाही.कच-या साठी लहान हातगाडया उपलब्ध नाही काही नागरीक स्वखर्चाने साफसफाई करतात.लोंडीग रिक्षा, घंटा गाडया ,ट्रक व जेसीबी ई.वाहने कचरा उचलणे व स्वच्छतेसाठी देण्याचे आदेश प्रशासनाला दयावेत.

श्री.मोहन मेघावाले :रोजेबाग भागात मोठा नाला वाहतो.ड्रेनेज लाईनचे काम संबधीत ठेकेदार यांनी अर्धवट केले तेथेच लोक कचरा आणून टाकतात ते पाणी नालीत पुढे वाहत न जाता लोकांच्या घरापर्यत जाते.घाण टाकल्यामूळे कॉलनीच्या लोकांना त्रास होतो डास मच्छरची पैदास होते.या बाबतीत कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात याव्यात.नाले साफ करावे दोन कामगार घेवून काम करावे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी उपस्थित नाही.पुढील सभेत या संदर्भात माहिती घेण्यात येईल.

श्री.अब्दुल रहीम नाईकवाडी:वार्ड 64 मध्ये 14 वर्षाचा मुलाचा नालीत वाहून मृत्यू झाला नालीवर ढापे तुटलेले आहे .ढापे टाकण्या बाबत विचारणा केली असता बजेट नाही अशी उत्तर मिळते.यासाठी तरतूद करावी.

श्री.मकरंद कुलकर्णी :बजेट हा विषय व्यक्तीच्या जीवा पेक्षा मोठा नाही, माता मंदीर जवळील नाल्याला मोठया प्रमाणात पाणी जमा होते.पुर्ण नालीवर समोरच्या भागात पाईप आहे मागील बाजूस अर्धवट पाईप ते जिर्न झाले सर्व पाईप काढावे एक सारखे नवीन पाईप टाकावे बजेटमध्ये तरतूद करावी.एक व्यक्तीचा मृत्यू झाला अशी घटना पुन्हा होऊ नये.

मा.सभापती : बजेट असेल तर तात्काळ त्या ठिकाणी पाईप व ढापे टाकावे.

श्री.इरशाद खान :1124 कर्मचाऱ्यामधील काही कर्मचारी यांना नुकतेच कायम करण्यात आले त्यांची वेतननिश्चिती करणे बाकी आहे ते तात्काळ करण्याचे सुचना कराव्यात.

श्रीमती कमल नरोटे :पावसाळा सुरू झाला कच-याचे निर्मुलन होत नाही माझ्या वार्डात शिवाजी कॉलनी मध्ये मोकळी जागा तेथे मोठा कचरा साचतो तो नियमीत उचलला जात नाही.

श्री.विकास एडके :माझ्या वार्डातील नाल्याची वरच्या वर साफसफाई केले.पुर्ण साफसफाई होत नाही.

मा.सभापती :विभाग प्रमुख उपस्थित नाही पुढील सभेत माहिती घेतली जाईल.

श्री.नितीन चित्ते :संभाजी महाराज पुतळा टी व्ही सेन्टर ते शरद हॉटेल मार्गे जळगाव रोड पर्यतच्या रस्त्याचे काम चालू आहे. यापुर्वीचा ठेकेदार चांगले काम करीत नव्हते म्हणून दुस-यांना काम दिले.ते सुध्दा व्यवस्थीत काम करीत नाही कामाचा दर्जा चांगला नाही तेथे स्थळ पाहणी करावी. थर्ड पार्टी इन्सपेक्शन करावे.तसेच एम-2 चा रस्ता राजमाता जिजाऊ चौक ते आंबेडकर चौक रस्त्यापर्यत मोठे खड्डे पडले. (छायाप्रत दाखवितात )या रस्त्यावर वाहतूक जास्त असते सिडको हडकोतील मुख्य रस्ता आहे.या रस्त्याचे काम तात्काळ करावे.

श्रीमती ज्योती पिंजरकर:या रस्त्याचे काम तातडीने करण्यात यावे.

श्री.नितीन चित्ते :शरद हॉटेल रोडचे काम चांगले झाले अभिनंदन,लेमनट्री, क्रांतीचौक सुंदर रस्ते झाले. संभाजी महाराज ते जळगाव रोडच्या कामात क्युरींग बरोबर होत नाही थर्ड पार्टी इन्सपेक्शन करावे.राजमाता जीजाऊ चौक ते गणेश विसर्जन मार्गावर खड्डे पडलेले आहेत या रस्त्यावर वाहतूक वर्दळ जास्त आहे.तसेच गट क्र.55 मिटमिटा येथील रेखाकंन अंतीम संदर्भात एक सचिंका माझ्याकडे आहे 8 नोव्हेंबर शासन अधिसुचना 2013 प्रमाणे त्या पुर्ण जागेच्या 20 टक्के जागा म्हाडाला दिली. 20 टक्के लॅण्ड टू म्हाडा रिव्हेन्यूव्ह टू ओनर याचा अर्थ काय ते ॲप्रोच कुठे आहे कलम 3 मध्ये नुसार म्हाडा आणि मालक असे एकत्रिकरण करू शकत नाही.यातील एमएसईबीसाठी 1200 स्क्वे.मी.जागा दिली. डीपी साठी जागा मंजूर आहे. पाहणी केली असता तेथे जागा उपलब्ध नाही.संचिकेमध्ये नमूद केले सरंक्षित भित बांधली 51 लक्ष खर्च आला तो कसा आला.ओपनस्पेस मध्ये विहिर असेल तर त्या रेखांकनास मंजूरी देतो का ?या संचिकेत लिहिले की त्या जागेवर विहीर नाही , हाय टेंशन वायर गेली नाही तसेच भिंत बांधली असे म्हटले ती अर्धवट पडलेली दिसून येते.भिंत पडल्यामूळे लोक जागेमध्ये प्लॉटींग करतील घरे होतील पुन्हा मनपाच्या खर्चाने भिंत बांधावी लागेल यात मनपाचे नुकसान होईल.भुखंड क्र.1 ही मोकळी जागा नाल्याची आहे त्यास मंजूरी दिली यास कोण जबाबदार आहे.त्याजागेचा 7/12 बघीतला असता त्यावर 3.50 कोटीचा बोजा दिला असे असतांना रेखांकनास मंजूरी दिली. तेथे प्लॉट होणार ज्यांना विकणार त्या नागरीकावर 3.50 कोटीचा बोजा टाकून फसवणूक होते की नाही सर्व खुलासा करावा.

सहा.संचालक(र.न) :एकूण 7 प्रश्न विचारले पुढील बैठकीत लेखी माहिती दिली जाईल.

श्री.मोहन मेघावाले :संभाजी महाराज पुतळा टी व्ही सेंन्टर जळगांव रस्त्या पर्यत होत असल्याचे रस्त्याच्या कामाची चौकशी व्हावी तसेच उध्दवराव पाटील चौक ते अण्णाभाऊ साठे चौक ते संभाजी महाराज पुतळया पर्यतच्या रस्त्याचे कामाची मुदत किती होती किती पेमेंन्ट दिले.किती काम झाले दिलेल्या कार्यकाळानुसार काम केले का या बाबत चौकशी करून लेखी देण्यात यावे.

मा.सभापती :आताच सुचना मांडल्या प्रमाणे त्या रस्त्याचे चांगले काम व्हावे व स.सदस्यांनी विचारलेली माहिती त्यांना लेखी देण्यात यावी.

| | |
|---|---|
| वार्ड अभियंता -ब | :स.सदस्य श्री.नाईकवाडी यांनी विचारलेल्या प्रश्नाबध्दल खुलासा की चिश्तीया कॉलनी ते आझाद चौक पर्यतच्या ड्रेनेज लाईनचे काम भुमीगत गटार योजनेत घेतले आहे त्यास मान्यता मिळाल्यास काम सुरू होईल. |
| मा.सभापती | :त्वरीत काम सुरू करावे.तसेच कच-या संदर्भात स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले त्या सुचना लक्षात घेवून घन कचरा प्रमुख यांनी कार्यवाही करावी. |
| श्री.राऊसाहेब आमले | :गट क्र.155 बाबत विचारलेल्या प्रश्नांची मला देखिल माहिती द्यावी. |

या बरोबरच आजची सभा राष्ट्रगिताने संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(महबूबखॉ पठाण)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद